संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सुसंवाद हरवलेली कुटुंब व्यवस्था

**विज्ञान** तंत्रज्ञानाचा वेग इतका प्रचंड आहे की जग एकमेकांच्या जवळ आणण्यामध्ये त्याचा सिंहाचा वाटा म्हणावा लागतो. पण आज जग काय किंवा व्यक्ती काय ही एकमेकांच्या जवळ जरी आली असली तरी ती मानसिकदृष्ट्या एकमेकांपासून तितकीच दूर आहे असे म्हणण्याची वेळ येते. आजच्या जागतिक कुटुंब दिनाचा विचार करीत असताना जग हे एक कुटुंब आहे इथपासून ते प्रत्येक कुटुंबातल्या विसंवादापासून काहीशी नकारात्मक परिस्थिती पाहायला मिळते. संयुक्त राष्ट्र संघाने हा दिवस घोषित करण्यामागचा उद्देश हा होता की समाजातल्या कुटुंबविषयक धारणा अधिक बळकट व्हाव्यात कारण कुटुंब हाच सगळ्या समाजाचा एक मोठा आधार असतो. प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे कुटुंब किंवा परिवार असतो. त्यावेळेस आई वडील, भाऊ बहिण, अशा एका विशिष्ट नातेसंबंधांचा समावेश होतो अर्थातच कुटुंबाचा विचार करताना आणि नातेवाईकही त्यात समाविष्ट होऊ शकतात. मग त्यात अगदी काका काकू, किंवा आत्या मावशी यांचाही अंतर्भाव करता येईल परंतु प्रामुख्याने कुटुंबाच्या व्याख्येमध्ये आई, वडील आणि भाऊ बहिण आजोबा आजी अशांचा हमखासपणे विचार केला जातो. कुटुंबाची ही रचना ही त्या त्या व्यक्तीसाठी पोषक तर असतेच. परंतु समाजाचीच वीणदेखील त्यानिमित्ताने घट्ट राहाते. एकमेकांना भावनिक किंवा मानसिक आधार देण्याचा प्रयत्न यानिमित्ताने होतो. कुटुंब जर अधिक भक्कम असेल आणि त्यांच्यामध्ये एकोप्याची भावना असेल तर त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थितीसुध्दा चांगली राहाते. या एकूणच समाजव्यवस्थेचा विचार करताना कुटुंब हा घटक महत्त्वाचा मानला जात असताना त्याचे लाभही तितकेच मोठे असल्याने ही कुटुंब व्यवस्थासुध्दा तितकीच भक्कम राहावी असा जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवा किंवा असाही उद्देश त्यातून साध्य होतो. भारतात प्राचीन काळापासून कुटुंब व्यवस्थेला प्रचंड महत्त्व दिले गेले. तर या विरुध्द पाश्चात्य जगतामध्ये कुटुंब व्यवस्थेला मुळापासूनच फारसे प्राधान्य दिले गेले नसल्याचे लक्षात येते. विशेषतः विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रसार झाल्यानंतर किंवा संपर्काची, संवादाची अनेकानेक साधने उपलब्ध झाल्यानंतर तसेच औद्योगिकीकरण आणि प्रचंड नागरीकरणामुळे कुटुंब व्यवस्थेला बरेच मोठे धक्के बसल्याचे पाहायला मिळते.

### वाढते नागरीकरण

आज संपूर्ण जगातल्या कुटुंब व्यवस्थेचा विचार केला तर आशादायक चित्र दिसत नाही. उलट प्रत्येक कुटुंबाची वाताहत होतानाच पाहायला मिळते. लोकसंख्या नियंत्रणाच्या परिणामातून मर्यादित कुटुंब ही संकल्पना समाजात रुजावी. परंतु या छोट्या किंवा न्युक्लिअस कुटुंबातही सुसंवादाची परिस्थिती शिल्लक राहिलेली नाही. अनेक युरोपिय राष्ट्रांमध्ये फॅमिली या शब्दाचाच लोप होईल की काय असे वाटू लागले. कारण लग्नानंतर पुढच्या पाच दहा वर्षातच होणारे घटस्फोटांचे प्रमाण पाहिले तर आश्चर्याचा धक्का बसतो. आणि अशा विभक्त झालेल्या जोडप्यांची मुले आई वडिलांच्या प्रेमाशिवाय किंवा नातेवाईकांच्या प्रेमाशिवाय लहानाचे मोठे होतात. कुटुंब म्हटल्यानंतर स्नेह, प्रेम किंवा एकमेकांमधील भक्कम असा सुसंवाद अभिप्रेत असतो. आज ही परिस्थिती पाश्चात्य देशांमध्ये राहिलेली दिसत नाही किंबहुना गेल्या काही वर्षात जगातल्या जवळपास पंच्याहत्तर देशांमध्ये ही समस्या आक्राळविक्राळ स्वरुपात पुढे आली आणि म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघाला जागतिक कुटुंब दिनासारखे उपाय शोधून काढावे लागले. आता या जागतिक कुटुंब दिनाचा कुटुंब व्यवस्था भक्कम करण्यासाठी किती उपयोग झाला हाही संशोधनाचा विषय ठरू शकेल परंतु भारतासह आणि देशातील सामाजिक परिस्थिती पाहिली तर एकूणच या व्यवस्थेला नवनवे तडाखे बसताना दिसतात. भौतिक किंवा तात्पुरत्या भावनिक गरजांसाठी एकत्र येणे हाच प्रमुख उद्देश दिसून येतो. प्रदीर्घ काळ एकमेकांच्या प्रेमळ सहवासात राहून एकमेकांना साहाय्यभूत होण्याची अंतरिक जाणीव नाहीशी होताना दिसून येते. त्याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे आणि कुटुंब व्यवस्था टिकवण्याचे आणखी ठोस उपाय योजले गेले पाहिजेत. एकाच रक्ताची नाती जर एकमेकांच्या उपयोगी पडत नसतील म्हणजे त्यांच्यामध्ये झिजण्याची किंवा त्यात करण्याची प्रवृत्ती शिल्लक राहात नसेल तर त्याचे अनेक दुष्परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतात. अर्थातच त्याचा परिणाम हा त्या त्या देशावर किंवा राष्ट्रावरही होतो.

### भारतातील एकत्र कुटुंब व्यवस्था

संपर्काची किंवा सुसंवादाची नवनवीन साधने उपलब्ध झाली. प्रत्येकाच्या हातात तर आता मोबाईल असतो त्या त्या कुटुंबातला कोणताही नातेवाईक जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात असेल तरी संपर्क साधणे सोपे झाले आहे. परंतु त्या सहज संपर्क यंत्रणेमुळे सुसंवाद नाहीसा झाला. किंवा त्यामध्ये औपचारिकपणा खूप आलेला आहे. एकेकाळी भारत हा एकत्र कुटुंब पध्दतीचा देश म्हणून गौरवला जात होता. शंभर शंभर जणांचे एकत्र कुटुंब शंभर शंभर वर्षे टिकून राहाण्याचा विक्रमही याच देशाने अनुभवला आहे. काळाच्या ओघामध्ये कुटुंब नियोजन हा प्रकार आला. पण नियोजनामध्ये केवळ कुटुंब नियंत्रण एवढाच त्याचा अर्थ घेतला गेला. कुटुंबांच्या नातेसंबंधांचे नियोजन किंवा व्यवस्थापन होऊ शकले नाही. नागरीकरणामुळे शहरामध्ये आलेली अनेक कुटुंबे जागेच्या कारणास्तव विभक्त होऊ लागली. काळाचा दबाव एवढा होता की महागाई किंवा आर्थिक क्षमता नसल्याने अनेक कुटुंबांवर नाईलाजाने विभक्त होण्याची वेळ आली. भौतिक सुखांची मुबलकता आणि त्यातून पैसा या प्रकाराला प्राप्त झालेले प्रचंड महत्त्व याच नातेसंबंधांवर किंवा कुटुंब व्यवस्थेवर खूप मोठा परिणाम करणारे ठरले. स्वाभाविकपणे विज्ञान तंत्रज्ञानाने संपर्काचे माध्यम उपलब्ध करून दिले असताना त्याचा उपयोग सुसंवादासाठी होऊ शकला नाही. त्यातून त्याच कुटुंबातल्या सदस्यांचा भावनिक कोंडमारा सुरू झाला आणि तो अजूनही तसाच कायम आहे.